फॉर्म नंबर ३२

भाग – 'अ'

(न्यायनिर्णयाचे शिर्षक पृष्ठ)

फौजदारी नियमावलीचे प्रकरण ६ मधील परीच्छेद क्रमांक ४४ (i)

MHJN050006312025

दाखल तारीख – १०/०६/२०२५

नोंदणी तारीख – १२/०६/२०२५

**निकाल तारीख – ०४/०५/२०२६**

कालावधी – ०० १० २४

वर्षे महिने दिवस

| | |
|---|---|
| | **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, (न्यायालय क्र.०१), परतूर, तालुका परतूर, जिल्हा जालना यांचे न्यायालय**<br>**(पिठासिन अधिकारी – व्ही. बी. डोंबे)**<br>**– न्यायनिर्णय –**<br>**नियमित फौजदारी खटला क्र.१७१/२०२५**<br>**निशाणी क्र.४३**<br>**गुन्हा क्र.५३४/२०२४** |
| फिर्यादी | **महाराष्ट्र शासन मार्फत**<br>पोलीस स्टेशन, अधिकारी<br>पोलीस स्टेशन, परतूर,<br>ता. परतूर, जि. जालना |
| अभियोग पक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता | **श्री. विनोद राठोड** |
| आरोपी | **१) लक्ष्मीनारायण भगवान जईद,**<br>वय – ३५ वर्षे, धंदा – निरंक<br>**२) भगवान गणपतराव जईद,** |

| | |
|---|---|
| | वय – ५५ वर्षे, धंदा – निरंक<br><br>**३) सोमनाथ भगवान जईद,**<br>वय – ३० वर्षे, धंदा – निरंक<br><br>**४) किरण भगवान जईद,**<br>वय – २७ वर्षे, धंदा – निरंक<br>वरील सर्व रा. सन्मित्र कॉलनी, परतूर<br>ता. परतूर, जि. जालना.<br><br>**५) प्रल्हाद संजय खरात,**<br>वय – २७ वर्षे, धंदा – निरंक<br>रा. ढवळेश्वर, ता. जि. जालना.<br><br>**६) अतिष राधाकिसन राडगावकर,**<br>वय – २७ वर्षे, धंदा – निरंक<br>ता. अंबड, जि. जालना. |
| आरोपींतर्फे विधिज्ञ | श्री. डी. जी. ताठे |
| गुन्ह्याची तारीख | ०२/१२/२०२४ |
| पहिली खबर दिनांक | ०३/१२/२०२४ |
| दोषारोपपत्राचा दिनांक | २८/०१/२०२५ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | १०/०३/२०२६ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | १०/०३/२०२६ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याचा दिनांक | निरंक |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | **०४/०५/२०२६** |

| | |
|---|---|
| शिक्षा दिल्याची तारीख / आदेश | **निर्दोष मुक्त केले.** |

**भाग – ब**
**फौजदारी नियमावलीचे प्रकरण ६ मधील परीच्छेद क्रमांक ४४ (ii)**
**आरोपींचा तपशील**

| आरोपींची श्रेणी | आरोपींचे नाव | अटक तारीख | जामीनवर सोडल्याच ी तारीख | अधिनियम | निर्दोष मुक्त केले किंवा शिक्षा दिली | दिलेली शिक्षा | सुनावणी दरम्यान जेलमध्ये असल्याचा कालावधी कलम ४२८ सी.आर.पी.सी प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १)<br><br>२)<br><br>३)<br><br>४) | **लक्ष्मीनारायण भगवान जईद,**<br><br>**भगवान गणपतराव जईद,**<br><br>**सोमनाथ भगवान जईद,**<br><br>**किरण भगवान जईद,** | सुचना पत्र देवुन सोडण्यात आले होते.. | दिनांक १२/११/ २०२५ | भा.न्या.सं.चे कलम १८९ (२), १९१ (२), १९१ (३), ११८ (१), ११५ (२), ३५२, ३५१ (२) व ३५१ (३) सहवाचन कलम | **आरोपी यांना निर्दोष मुक्त केले** | **निरंक** | **निरंक** |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५)<br><br>६) | **प्रल्हाद संजय खरात**<br>**अतिष राधाकिसन राडगावकर** | | | १९० अन्वये | | | |

**भाग – क**

**फौजदारी नियमावलीचे प्रकरण ६ मधील परीच्छेद क्रमांक ४४ (iii)**

**अभियोगपक्षाच्या साक्षीदारांची यादी / बचाव / न्यायालयाचे साक्षीदार**

**अ. अभियोग**

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप<br>(प्रत्यक्ष साक्षीदार, पोलिस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, ईतर साक्षीदार) |
|---|---|---|
| अ.सा.क्र.०१ | किशोर भगवान हारकळ | फिर्यादी |
| अ.सा.क्र.०२ | भगवान आण्णासाहेब हारकळ | जखमी साक्षीदार |
| अ.सा.क्र.०३ | पुजा सुरेश हारकळ | जखमी साक्षीदार |
| अ.सा.क्र.०४ | सुरेश भगवान हारकळ | जखमी साक्षीदार |

**ब. बचाव साक्षीदार, ईतर**

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप<br>(प्रत्यक्ष साक्षीदार, पोलिस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, ईतर साक्षीदार) |
|---|---|---|
| डि.सा.क्र.०१ | निरंक | निरंक |

**क.कोर्ट साक्षीदार, ईतर**

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप<br>(प्रत्यक्ष साक्षीदार, पोलिस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, ईतर साक्षीदार) |
|---|---|---|
| सी.सा.क्र.०१ | निरंक | निरंक |

**अभियोगपक्षाचे / बचाव / कोर्ट निशाणी**

**अ. अभियोग**

| अनु. क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १. | ३६ | घटनास्थळ पंचनामा<br>(आरोपींनी मान्य केला.) |
| १. | ३७ | जप्ती पंचनामा<br>(आरोपींनी मान्य केला.) |
| ३. | ३८ ते ४० व ४२ | वैद्यकिय प्रमाणपत्र<br>(आरोपींनी मान्य केले.) |

**ब. बचाव**

| अनु. क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**क. कोर्ट साक्षीदार, ईतर**

| अनु. क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

**ड. मुद्देमाल**

| अनु. क्र. | मुद्देमाल क्र. | तपशील |
|---|---|---|
| १. | एम. आर. नंबर ४४/२०२५ | १) एक लाकडी दांडा असलेली कुऱ्हाड जिचे पाते अंदाजे तीन इंच असलेली<br>२) एक अंदाजे दोन फुटाची लाकडी काठी<br>३) एक समोरील बाजुस वाकलेला लोखंडी गज ज्याची लांबी अंदाजे तीन फुट<br>४) एक लोखंडी धारदार पाते असलेला चाकु जुना वापरता |

## न्यायनिर्णय
## (दिनांक ०४/०५/२०२५)

प्रस्तुत खटला आरोपींविरूध्द भारतीय न्याय संहिता (यापुढे '**भा.न्या.सं.**' असे संबोधण्यात येईल) चे कलम १८९ (२), १९१ (२), १९१ (३), ११८ (१), ११५ (२), ३५२, ३५१ (२), ३५१ (३) सह वाचन कलम १९० अन्वये चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाच्या खटल्यातील तथ्य खालील प्रमाणे आहेत.**

**२)** किशोर भगवान हारकळ (यापुढे '**फिर्यादी**' असे संबोधण्यात येते) हा दिनांक ०२/१२/२०२४ रोजी रात्री ११.०० वाजताच्या सुमारास, त्याची बहीण ज्योती रामेश्वर जाधव, असे त्यांचे घरासमोर बोलत बसलेले असताना, त्यांचे नातेवाईक म्हणजे आरोपी क्र.१ ते ६ हे त्यांचे घरासमोर आले व त्यांना म्हणु लागले

की, "तुम्ही शिवकन्या नारायण जईद हिला नांदायला का पाठवित नाही". त्यावर ते त्यांना म्हणाले की, "तुम्ही माझ्या बहिणीला मारहाण करता, शिवीगाळ करता, तिला त्रास देता, त्यामुळे आम्ही माझ्या बहिणीला नांदायला पाठवित नाही", असे त्यांना समजावून सांगत असताना, आरोपी त्याला व त्याच्या बहिणीला शिवीगाळ करू लागले. त्यांचा भांडणाचा आवाज आल्याने, त्याचा भाऊ सुरेश भगवान हारकळ, त्याची वहिणी पुजा सुरेश हारकळ, वडील भगवान अण्णासाहेब हारकळ व आई लक्ष्मी भगवान हारकळ असे त्यांच्याकडे गेले व त्यांना म्हणु लागले की, "तुम्ही आम्हाला शिवीगाळ का करता", असे म्हणताच त्याचे दाजी म्हणजे आरोपी क्र.१ ने त्याच्या वडीलांना धरले व आरोपी क्र.३ व ४ यांनी त्यांच्या हातातील लोखंडी गजाने डोक्यात मारून जखमी केले. तसेच, आरोपी क्र.२ ने त्याच्या हातातील कुऱ्हाडीच्या तुंबरण्याने त्याचा भाऊ सुरेश यास डोक्यावर मारून जखमी केले. तसेच, आरोपी क्र.४ ने सुध्दा सुरेश यास लाथाबुकयांनी मारहाण केली. त्याचप्रमाणे, फिर्यादीचे डाव्या बरगडीवर आरोपी क्र.५ ने त्याच्या हातातील चाकुने मारून जखमी केले व त्याची वहिनी पुजा हिला आरोपी क्र.६ ने त्याच्या हातातील काठीने डोक्याला मारून जखमी केले. त्याचबरोबर, आरोपी त्यांना म्हणाले की, "तुम्ही जर आमच्या नादी लागले, तर तुम्हाला एका एकाला जिवे मारू", असे म्हणून त्यांना जिवे मारण्याच्या धमक्या देखल दिल्या. त्यांचे भांडण चालु असताना, शिवनाथ बाबासाहेब पडुळे, रेणुकादास गणपत गायकवाड यांने त्याचे भांडण पाहिले व सोडवा सोडव केली. त्यानंतर फिर्यादीने पोलीस स्टेशन, परतूर येथे जावून

प्रस्तुतची फिर्याद दिली आहे.

३) आरोपी न्यायालयात हजर झाल्यानंतर निशाणी क्र.२१ वर त्यांचे विरूध्द भा.न्या.सं चे कलम १८९ (२), १९१ (२), १९१ (३), ११८ (१), ११५ (२), ३५२, ३५१ (२), ३५१ (३) व सह कलम १९० अन्वये दोषारोप निश्चित केले. त्यानंतर आरोपींचे निवेदन निशाणी क्र.२२ ते २७ वर नोंदविण्यात आले. आरोपींना दोषारोप समजाऊन सांगून गुन्हा कबूल आहे काय ? अशी विचारणा केली असता, त्यांनी गुन्हा नाकबूल करून प्रकरण चालविण्याची विनंती केली होती.

४) आरोपींविरूध्द गुन्हा सिध्द होण्याकरीता अभियोग पक्षातर्फे वर नमुद केल्याप्रमाणे एकूण तीन साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. सदरचे तिन्ही साक्षीदार हे अभियोग पक्षास फितुर झाले आहे. त्यानंतर सदर साक्षीपुरावा चालु असताना, निशाणी क्र.३१ प्रमाणे आरोपी व फिर्यादी यांनी आपसी तडजोड पत्र दाखल केले. परंतु, भा.न्या.सं. चे कलम १८९ (२), १९१ (२), १९१ (३) व ११८ (१) हे तडजोड पात्र गुन्हा नसल्याने, सदर तडजोड नामंजूर करून प्रकरण पुढे चालविण्यात आले. त्यानंतर अभियोग पक्षाने पुरशिस (निशाणी क्र.३५) वर सादर करून त्यांच्या पुराव्याची बाजु बंद केली.

५) आरोपींविरूध्द गुन्हयात गोवणारा पुरावा न आल्यामुळे फौजदारी

प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) प्रमाणे आरोपींचे जबाब वगळण्यात आले.

६) अभियोग पक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. विनोद राठोड यांचा युक्तीवाद ऐकला. तसेच, आरोपींतर्फे वकील श्री. डी. जी. ताठे यांचा युक्तीवाद ऐकला.

७) न्यायालयासमोर आलेल्या तोंडी व कागदोपत्री पुराव्यावरून खालील मुद्दे निष्कर्षासाठी काढलेले आहेत व त्यांची योग्य ती कारणमिमांसा खालील प्रमाणे देण्यात आलेली आहे.

| अनु.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | दिनांक ०२/११/२०२४ रोजी रात्री ११.०० वाजताच्या सुमारास, सन्मित्र कॉलनी, परतूर, ता. परतूर, जि. जालना येथील फिर्यादीचे घरासमोर, आरोपींनी समान उद्देशाच्या पुर्ततेसाठी, आरोपी गैरकायदेशिर जमावाचे सदस्य असतांना गुन्हा घडविला, असे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | **नकारार्थी** |
| २) | वर नमूद तारीख, वेळी व ठिकाणी, आरोपींनी समान उद्देशाच्या पुर्ततेसाठी, आरोपी गैरकायदेशिर जमावाचे सदस्य असतांना दंगा घडविला, असे अभियोग पक्षाने सिध्द केले काय? | **नकारार्थी** |
| ३) | वर नमूद तारीख, वेळी व ठिकाणी, आरोपींनी समान उद्देशाच्या पुर्ततेसाठी, आरोपी गैरकायदेशिर जमावाचे सदस्य असताना चाकु, कुऱ्हाड व काठी या सारखे घातक शस्त्र वापरुन दंगा घडविला, असे अभियोग पक्षाने सिध्द केले काय? | **नकारार्थी** |

| | | |
|---|---|---|
| ४) | वर नमूद तारीख, वेळी व ठिकाणी, आरोपींनी समान उद्देशाच्या पुर्ततेसाठी, आरोपी गैरकायदेशिर जमावाचे सदस्य असतांना, आरोपी क्र.३ व ४ यांनी लोखंडी गजाने फिर्यादीचे वडील यांना डोक्यात मारले, तसेच, आरोपी क्र.२ ने कुऱ्हाडीच्या तुंबरण्याने फिर्यादीचा भाऊ सुरेश यास डोकयात मारले, तसेच, आरोपी क्र.५ ने फिर्यादीस चाकुने डाव्या बरगडीवर मारले व आरोपी क्र.६ ने फिर्यादीची वहिनी हिस काठीने डोक्यात मारून इच्छापुर्वक गंभीर दुखापती केल्या, असे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | **नकारार्थी** |
| ५) | वर नमूद तारीख, वेळी व ठिकाणी, आरोपींनी समान उद्देशाच्या पुर्ततेसाठी, आरोपी गैरकायदेशीर जमावाचे सदस्य असतांना, आरोपींनी फिर्यादी व साक्षीदार हे प्रक्षुब्ध होऊन त्यांनी सार्वजनिक शांततेचा भंग करावा अथवा त्यांचे हातून कोणतातरी अपराध घडावा, या हेतुने फिर्यादी व त्यास अपमानीत केले, असे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | **नकारार्थी** |
| ६) | वर नमुद तारिख, वेळी व ठिकाणी, आरोपींनी समान उद्देशाच्या पुर्ततेसाठी, आरोपी गैरकायदेशीर जमावाचे सदस्य असतांना, आरोपींनी फिर्यादी व साक्षीदार यांना जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या, असे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | **नकारार्थी** |
| ७) | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

**<u>का र ण मि मां सा</u>**

**<u>मुद्दे क्रमांक १ ते ७ करीता</u>**

८) वरील सर्व मुद्दे एकमेकांशी संबंधीत असून त्यासंबंधी अभिलेखावर आलेला पुरावा एकत्रित आल्यामुळे वरील सर्व मुद्दे निष्कर्ष नोंदविण्याकरीता एकत्रित घेतले आहे.

९) अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ किशोर भगवान हारकळ हा प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादी असून साक्षीदार क्र.२ भगवान आण्णासाहेब हारकळ हा फिर्यादीचा मुलगा असून आरोपी क्र.३ पुजा सुरेश हारकळ ही फिर्यादीची वहिनी आहे. त्यांनी सरतपासा दरम्यान असे कथन केले आहे की, सदरची घटना दोन वर्षापुर्वी त्यांच्या घरासमोर घडली होती. त्यावेळी आरोपी व त्यांच्यामध्ये किरकोळ कारणांवरून वाद झाले होते. वाद झाल्यामुळे तेथे गर्दी जमा झाली होती. गर्दीत कोणी कशाने मारले, ते त्यांना समजले नाही. नंतर ते परतूर, पोलीस स्टेशन येथे गेले होते व तेथून चिठ्ठी घेवून ते दवाखान्यात गेले होते. त्यानंतर फिर्यादीने पोलीस स्टेशन येथे जावून घटनेची फिर्याद दिली होती. या व्यतिरिक्त काहीही घडले नाही, असे सांगितले आहे.

१०) फिर्यादी व दोन्ही जखमी साक्षीदार हे अभियोग पक्षास सहकार्य करत नसल्यामुळे अभियोग पक्षाने त्यांच्या उलट तपासणीची परवानगी मागितली होती. उलट तपासणीची परवानगी देण्यात आली. परंतु, फिर्यादी व जखमी साक्षीदाराने त्यांच्या उलट तपासामध्ये त्यांना विचारण्यात आलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे नकारार्थी देऊन आरोपींसोबत त्यांचा न्यायालयाबाहेर आपसात तडजोड झाली आहे, असे मान्य केले आहे. उलट तपासामध्ये सरकारी पक्षाने आरोपींविरुध्द गून्हा सिध्द

होईल, असा कोणताही तोंडी अथवा लेखी पूरावा न्यायालयीन पटलावर आणला नाही. दाखल कागदपत्राचे अवलोकन केले असता, निशाणी क्र.३१ वर फिर्यादी व आरोपी यांच्या स्वाक्षरीने तडजोडपत्र दाखल केले आहे. या वरुन असे दिसून येते की, आरोपी व फिर्यादी यांच्यात आपसी समझोता झाला आहे. म्हणून त्यांची साक्ष अभियोग पक्षाच्या कथनास सहाय्यक नाही.

**११)** प्रस्तुत प्रकरणात फिर्यादी व जखमी साक्षीदारांनी स्वतःच घडलेली घटना नाकारत आहे. अशाप्रकारे आरोपींना सिध्द दोषी ठरविण्यात येईल, अशी साक्ष फिर्यादी व जखमी साक्षीदाराने दिलेले नाही. त्यामुळे, आरोपींविरुद्ध करण्यात आलेला तपास सिद्ध झाला नाही. आरोपींनी घटनास्थळ पंचनामा व जप्ती पंचनामे मान्य केले आहे. परंतु, फिर्याद सिद्ध न झाल्यामुळे कथित घटनास्थळावर घटना घडली होती, हे सिद्ध होत नाही. त्यामुळे आरोपींनी जरी कथित घटनेचे घटनास्थळ व कथित जप्ती पंचनामे मान्य केली असले, तरी त्यांचा उपयोग आरोपींविरुद्ध होत नाही. त्याचप्रमाणे, आरोपींनी वैद्यकीय प्रमाणपत्र मान्य केले आहेत. परंतु, कथित दुखापत आरोपींच्या वतीने फिर्यादी व जखमी साक्षीदाराला झाली, असे फिर्यादी व जखमी साक्षीदारांनी त्यांच्या साक्षी दरम्यान सांगितलेले नाही. त्यामुळे आरोपींनी मान्य केलेल्या दस्तऐवजांचा उपयोग त्यांच्याविरुध्द होत नाही. त्यामुळे आरोपींविरूध्द करण्यात आलेले आरोप सिध्द झाले नाही. त्यामुळे आरोपी प्रस्तुत गुन्हयातून निर्दोष सुटका होण्यास पात्र आहे. करिता मी **मुद्दे क्र.१ ते ६ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवुन मुद्दा क्र.७ च्या उत्तराकरीता खालील आदेश** पारीत करीत आहे.

## आ दे श

१) आरोपी क्र.१ **लक्ष्मीनारायण भगवान जईद**, आरोपी क्र.२ **भगवान गणपतराव जईद**, आरोपी क्र.३ **सोमनाथ भगवान जईद**, आरोपी क्र.४ **किरण भगवान जईद**, आरोपी क्र.५ **प्रल्हाद संजय खरात** व आरोपी क्र.६ **अतिष राधाकिसन राडगावकर** यांना भारतीय नागारिक सुरक्षा संहितेचे कलम २७१(१) प्रमाणे भारतीय न्याय संहितेचे कलम १८९ (२), १९१ (२), १९१ (३), ११८ (१), ११५ (२), ३५२, ३५१ (२), ३५१ (३) व सह कलम १९० प्रमाणेच्या दोषारोपातून **निर्दोष मुक्त** करण्यात येत आहे.

२) जप्त मुद्येमाल एक लाकडी दांडा असलेली कुऱ्हाड जिचे पाते अंदाजे तीन इंच असलेली, एक अंदाजे दोन फुटाची लाकडी काठी, एक समोरील बाजुस वाकलेला लोखंडी गज ज्याची लांबी अंदाजे तीन फुट व एक लोखंडी धारदार पाते असलेला चाकु हे मुल्यहीन असल्याने अपील कालावधी नंतर त्यांची नियमानुसार योग्य ती विल्हेवाट लावण्यात यावी.

३) खटल्या दरम्यान दाखल असलेला आरोपींचा जामीन फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७ (अ) चे पुर्तते कामी पुढील सहा महीन्या करीता कायम करण्यात येत आहे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

Digitally signed by VRUSHALI BABURAO DOMBE
Date: 2026.05.04 17:23:04 +0530

स्थळ : परतूर.
दिनांक : ०४/०५/२०२६

(व्ही. बी. डोंबे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
परतूर

## -:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Junior Clerk | :- | Shantanu Suryakant Kapale |
| Court Name | :- | V. B. Dombe,<br>Civil Judge (J.D.), Partur |
| Order dictated on | :- | 04.05.2026 |
| Transcription ready on | :- | Direct on Computer |
| Order signed by P.O. on | :- | 04.05.2026 |
| Order uploaded on | :- | 04.05.2026 |

Sd/-
(Shantanu S. Kapale)
Junior Clerk